महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

Rs.2/-

मुख्य संपादक : रविंद्र घोडविंदे ■ कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ २९ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०६७ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

थोडक्यात महत्वाचे



## रस्ते - वाहतूक कोंडीवर जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**झिडके- अंबाडी :** ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील जनतेच्या चिंतेचा विषय म्हणजे अंत्यत वाईट अवस्थेतील रस्त्ये आणि त्याचबरोबर वाहतूक कोंडीने त्रस्त झालेली जनता.याबाबत उपाययोजना या दृष्टीकोनातून रविवार दिनांक- 26/08/2025 रोजी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाल व ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ.डी.एस्.स्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत खासदार- सुरेश म्हात्रे,माजी केंद्रीय राज्यमंत्री-कपिल पाटील,आमदार- रईस शेख, महेश चौगुले, शांताराम मोरे, शिवसेना नेते-प्रकाश पाटील आदि लोकप्रतिनिधींसह श्रमजीवी संघटनेचे पदाधिकारी बाळाराम भोईर( सरचिटणीस),अशोक सापटे ( जिल्हाध्यक्ष), प्रमोद पवार ( प्रवक्ते), दशरथ भालके, राजेश चन्ने (जिल्हा सरचिटणीस), नंदाताई वाघे, संतोष गावीत ( ठाणे शहर पदाधिकारी) आदिंची आवर्जुन उपस्थिती होती.

या बैठकीत शासन आणि प्रशासनातील जबाबदार पदाधिकारी आणि अधिकारी यांच्या महत्त्वपूर्ण विषयांच्या दृष्टीकोनातून बैठकीत श्रमजीवी संघटनेकडून जिल्ह्यातील अत्यंत दयनीय अवस्थेतील रस्ते आणि दैनंदिन बाबतीतील वाहतूक कोंडी याबाबत जिल्ह्यातील नवनियुक्त जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाल यांचे लक्ष वेधून,आजपर्यंत संघटनेला वेळोवेळी जनतेच्या साठी करावी लागणारी आंदोलने यांची जाणीव जिल्हाधिकारी यांना करून देत असतानाच, जिल्ह्यातील रस्त्यांच्या कामात झालेला भ्रष्टाचार आणि संबंधित ठेकेदार व अधिकारी यांच्यावर न होणाऱ्या कारवाईबाबत जिल्हाधिकारी यांच्यासमोर अगदी संतप्तपणे आपली भावना व्यक्त करावी लागली. कारण रस्त्य समस्यां आणि वाहतूक कोंडीमुळे गेल्या अनेक वर्षांपासून शेकडो निरपराध नागरिकांना आपले जीव गमवावे लागले आहेत,तरीदेखील आजपर्यंत याबाबतीत शासन स्तरावर गांभीर्यपूर्वक दखल न घेतल्यामुळे जनतेमध्ये तीव्र संताप आणि नैराश्य निर्माण झाले आहे.तरीही या बैठकीमधून काही ठोस निर्णय होणार आहेत का? याकडे जिल्ह्यातील तमाम जनतेचे लक्ष लागून राहिले आहेत.

# दीड दिवसांच्या बाप्पाला साश्रू नयनांनी निरोप



परिमंडळ निहाय्य दीड दिवसांच्या गणपतींची विसर्जन आकडेवारी

| परिमंडळ | सार्वजनिक | घरगुती |
|---|---|---|
| परिमंडळ १ (ठाणे) | ०० | ४१३५ |
| परिमंडळ २ (भिवंडी) | ०१ | ४७९० |
| परिमंडळ ३ (कल्याण) | ०१ | १३०२० |
| परिमंडळ ४ (उल्हासनगर) | ०१ | ९९८० |
| परिमंडळ ५ (वागळे इस्टेट) | ०३ | ११७५३ |
| एकूण ———————— | ०६ | ४३,६७८ |

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या जयघोषात साश्रुनयनांनी ठाणे जिल्ह्यातील गणेशभक्त दीड दिवसांच्या बाप्पाला निरोप देत आहेत. ठाणे जिल्ह्यात ४३ हजार ६८४ दीड दिवसाचे गणपती विरजमान झाले होते. त्यापैकी ६ गणपती सार्वजनिक मंडळात तर, उर्वरित ४३ हजार ६७८ घरगुती गणपती आहेत. दीड दिवसाच्या गणपती विसर्जनाला गुरुवारी दुपार पासून सुरुवात झाली आहे. भक्तीमय वातावरणात गणेशभक्त हे गणपतीला निरोप देता आहेत. वाजत गाजत, ढोल ताशांच्या गजरात, टाळ मृदुंगाच्या निनादात बुधवारी गणपतीचे घरोघरी तसेच सार्वजनिक मंडळात आगमन झाले. ठाणे जिल्ह्यात १ लाख ५७ हजार ८४२ गणपती मूर्तीची प्रतिष्ठापना झाली. त्यात, १ हजार ६० सार्वजनिक तर, १ लाख ५६ हजार ७८२ घरगुती गणपतींचा समावेश होता.

गुरुवारी दीड दिवसांच्या गणपतींना निरोप दिला जात आहे. गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर अशा जयघोषात गुरुवारी दुपार पासून दीड दिवसाच्या गणपतीच्या विसर्जन मिरवणूका निघत आहेत. गणपतीला निरोप देताना अनेकांचे मन सुन्न झाल्याचे दिसत आहे. ठाणे शहरातील विसर्जन घटावर दुपार पासून गणेश भक्तांची गर्दी झाल्याचे दिसत आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात कृत्रिम तलाव आणि फिरत्या विसर्जन व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे. गेल्यावर्षी पेक्षा दीड पट जास्तीची विसर्जन व्यवस्था केली आहे.

# लाचखोरी प्रकरणात ग्रामविकास अधिकारी एसीबीच्या ताब्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी येथे कंत्राटदाराच्या देयकाची रक्कम पूर्ण देण्याच्या मोबदल्यात ३० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या भिवंडी तालुक्यातील पडघा जवळील बोरीवली ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास अधिकारी विद्या बनसोडे (४६) यांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले आहे. त्यांच्याविरोधात पडघा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

तक्रारदार हे कंत्राटदार असून त्यांनी पडघा येथील बोरीवली ग्रामपंचायतीच्या हद्दीत रस्त्याच्या दुरुस्तीचे काम घेतले होते. रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर ग्रामविकास अधिकारी विद्या बनसोडे यांनी तक्रारदार यांच्याकडून मंजूर देयकाची सर्व रक्कम हवी असल्यास देयकाच्या तीन टक्के प्रमाणे ३० हजार रुपयांची मागणी केली. यानंतर तक्रारदार यांनी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सोमवारी सापळा रचून बनसोडे यांना लाचेप्रकरणी ताब्यात घेतले. याप्रकरणी पडघा पोलीस ठाण्यात बनसोडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकणाचा सखोल तपास सुरू आहे.

# मराठा आरक्षणासाठी जरांगे मुंबईकडे रवाना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून सगेसोयऱ्यांचे आरक्षण देण्याच्या मागणीसाठी जरांगे-पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली मराठा आंदोलक अंतरवाली सराटीहून मुंबईच्या दिशेने रवाना झाले. जुन्नर, राजगुरु नगर, खेड, चाकण, तळेगाव, लोणावळा, पनवेल, वाशी आणि चेंबूर असा प्रवास करत हा मराठा मोर्चा २८ ऑगस्ट रोजी मुंबईतील आझाद मैदानात पोहोचणार आहे.

जरांगे पाटील यांचा ताफा आंतरवाली सराटीच्या वेशीवरुन वडीगोद्री येथे पोहोचला. या मराठा मोर्चाचा आजचा मुक्काम जुन्नरमध्ये असेल.

जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटीतून निघण्यापूर्वी मुंबईतील आझाद मैदानात दीर्घकाळ आमरण उपोषणाला बसावे लागेल, याची कल्पना मराठा आंदोलकांना दिली. ही आरपारची आणि शेवटची लढाई आहे. कितीही वेळ लागला तरी आपण मुंबई सोडायची नाही, असे त्यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर मराठा आंदोलक महिनाभर मुंबईत राहावे लागेल, अशी तयारी करुन घराबाहेर पडले आहेत. राज्यभरातील गाव गाड्यांमधून मराठा बांधव आरक्षणासाठी मुंबईकडे निघाले आहेत. परभणी जिल्ह्यातील प्रत्येक गावातून विविध गाड्यांच्या माध्यमातून मराठा समाजबांधव, युवक हे मुंबईकडे निघाले आहेत.

दोन महिन्याचा किराणा, गॅस शेगडी व इतर साहित्य घेऊन हे मराठा बांधव मुंबईकडे निघाले आहेत. जोपर्यंत मराठा आरक्षण मिळत नाही तोपर्यंत मुंबई सोडणार नसल्याचा निर्धार या मराठा बांधवांनी केला आहे.

# आंतरमहाविद्यालयीन निबंध आणि वक्तृत्व स्पर्धेत जीवनदीप महाविद्यालय प्रथम!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** १८ ऑगस्ट ते २३ ऑगस्ट, २०२५ दरम्यान कलानी महाविद्यालय उल्हासनगर येथे प्रकृती बंधन - आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये विविध स्पर्धा पार पडल्या त्यातील निबंध स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धा या मध्ये आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. रोहिणी गणपत चौधरी हिने प्रथम क्रमांक पटकावला.




यावेळी सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन तिचा यथोचित असा सन्मान करण्यात आला. सदर विद्यार्थिनी ही तृतीय वर्ष विज्ञान (रसायनशास्त्र) वर्गात शिकत आहे. तब्बल १२० हुन अधिक विद्यार्थी या स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. तिच्या या यशाबद्दल जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर, संस्थेचे संचालिका मा. सौ. स्मिता घोडविंदे मॅम, संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे सर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर यांनी कौतुक व अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी सांस्कृतिक विभाग प्रमुख स. प्रा. विजय सोनार, स. प्रा. तनुजा देसले (सदस्य) तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनीदेखील विद्यार्थिनीचे कौतुक केले आणि शुभेच्छा दिल्या.




# कल्याण-डोंबिवलीतील पर्यावरण पूरक विसर्जन स्थळे आता एका क्लिकवर !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भाद्रपद महिन्यातील श्री गणेशोत्सव दि. 27 ऑगस्ट ते दि.06 सप्टेंबर 2025 या कालावधीत संपन्न होत आहे. या वर्षीच्या श्री गणेशोत्सवात गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना केलेल्या श्री गणेश भक्तांना, सार्वजनिक श्री गणेश मंडळांना आपल्या श्री गणेशाच्या मूर्तीचे विसर्जन करणे सोयीचे व्हावे, याकरीता प्रभाग निहाय नैसर्गिक व कृत्रिम विसर्जन स्थळांची माहिती त्यांच्या गुगल मॅप"सहीत (Location) https://mandapsinglewindowsystemkdmc.in/place/place या लिंकवर आज पासून म्हणजे दि. २७ ऑगस्ट २०२५ रोजी पासून नागरीकांच्या माहितीसाठी उपलब्ध होईल. वरील लिंकवर क्लिक केल्यावर " प्रभाग-पत्ता-विसर्जन स्थळाचे नाव- गुगल मॅप" या स्वरुपात माहिती उपलब्ध होणार असल्याने, नागरीकांना आपले घर/मंडळा नजीकच्या विसर्जन स्थळी श्री गणेश मूर्तीचे विसर्जन करता येईल त्याचप्रमाणे यामध्ये परिसरातील वाहतुकीचे चित्र देखील स्पष्ट होणार असल्यामुळे नागरिकांना विसर्जन स्थळ सुनिश्चित करणे सोयीचे होणार आहे.



## पावसाळ्यात तुळशीची काळजी कशी घ्यावी ?



पावसाळ्यात कीटकांची लागण टाळण्यासाठी तुळशीला नैसर्गिक कीटकनाशकांचा वापर करावा. दमट हवामान, कमी सूर्यप्रकाश आणि वाढलेली आर्द्रता यामुळे तुळशीच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. हळद आणि लसूण पाण्यात उकळून त्याचा थोडा फवारा मारल्यास कीटक दूर राहतात. शिवाय तुळशीच्या आजूबाजूला थोडी धणे पूड टाकल्यास बुरशी लागण्याची शक्यता कमी होते.

पावसाळ्यात तुळस वाकते, सुकते याचं एक मुख्य म्हणजे चुकीचा समज. अनेकांना असे वाटते पावसाळा सुरु आहे. पावसाचे पाणी तुळशीला मिळतच आहे. त्यामुळे वेगळे पाणी द्यायची काहीच गरज नाही. मात्र हा समज अगदी चुकीचा आहे. पावसाचे पाणी तुळशीला मिळतेच असे नाही. कुंडीची जागा, पावसाची पडण्याची दिशा यामुळे कुंडीच्या तळाशी पाणी जाते की नाही हे तपासून घ्या आणि गरज माती सुकी असेल तर योग्य तेवढे पाणी द्यायचे.

पावसाळा संपत आला की तुळशीच्या कुंड्यात थोडं खत टाकावं. ज्यामुळे ती पुन्हा छान टवटवीत दिसायला लागते. सेंद्रिय खतच वापरणं चांगलं. जसं की गांडूळ खत किंवा शेणखत. हे खत थेट मुळाजवळ न टाकता मातीत छान एकजीव करायचं.

## घरगुती टिप्स

## तांदूळ खराब होऊ नये म्हणून वापरा ही जादूई पोटली

तांदूळ हे आपल्या रोजच्या जेवणातील महत्वाचा पदार्थ असल्याने आपण घरात एकदम एकाच वेळी भरपूर प्रमाणात तांदूळ साठवून ठेवतो. तांदूळ फार मोठ्या प्रमाणांत साठवतानात्यांची विशेष काळजी घ्यावी लागते. तांदुळ साठवताना जर ते योग्य पद्धतीने साठवले नाहीत तर त्यात त्यात किडे, अळ्या किंवा पोरकिडे होऊ लागतात, ज्यामुळे ते खराब होतात आणि वापरण्यायोग्य राहत नाहीत. तांदळात किडे, अळ्या किंवा पोरकिडे होऊ नये म्हणून आपण वेगवेगळ्या प्रकारचे केमिकल्युक्त पावडर, औषध तांदुळात घालून ठेवतो. परंतु अशाप्रकारे केमिकल्सयुक्त उपायांचा वापर करण्यापेक्षा, घरगुती व पारंपरिक उपाय हे कधीही उत्तमच.

तांदुळात किडे, अळ्या किंवा पोरकिडे होऊ नये म्हणून बाजारातील केमिकलयुक्त उपाय वापरण्यापेक्षा घरगुती नैसर्गिक पद्धत अधिक सुरक्षित आणि फायदेशीर ठरते. किचनमधील काही मसाल्यांची छोटीशी पोटली बनवून तांदळात ठेवली, तर तांदूळ ताजा राहतो आणि किडे होण्याची शक्यता कमी होते. या सोप्या उपायाने तुमचे तांदूळ दीर्घकाळ टिकतील आणि ताजे राहतील. तांदूळ खराब होऊ नये म्हणून त्यात नेमकी जादूई पोटली टाकावी ते पाहा.

तुमच्या तांदळात आधीच किडे लागले असतील तर ते चांगले चाळून स्वच्छ करून घ्या. तांदळात एकही किडा राहता कामा नये. आता हे तांदूळ हवाबंद आणि कोरड्या डब्यात भरा. डब्यात अजिबात ओलावा नसावा, नाहीतर त्यात किडे किंवा अळ्या लगेच होतील. तांदूळ पूर्णपणे कोरडे असतील याची खात्री करा, कारण तांदळात ओलावा असल्यास बुरशी येण्याचा धोका असतो.एक टिशू पेपर किंवा एक छोट सुती कपडा घेऊन त्याच्या मध्यभागी अर्धा चमचा हळद आणि अर्धा चमचा मीठ घाला. त्यांच्यावरच १० ते १२ अख्ख्या लवंगा आणि १० ते १२ अख्ख्या काळ्यामिरी घाला. आता टिशू पेपर किंवा कपडा चारही बाजूंनी उचलून एक छोटी पोटली बनवा आणि त्याला दोऱ्याने घट्ट बांधा. पोटली चांगली बांधलेली असावी जेणेकरून त्यातील कोणताही पदार्थ बाहेर पडणार नाही याची काळजी घ्या. आता तुम्ही ज्या डब्यात तांदूळ साठवून ठेवणार आहात, त्यात ही पोटली तळाशी किंवा मध्यभागी दाबून ठेवा. तुमच्याकडे तांदळाचे प्रमाण जास्त असेल तर तुम्ही एकापेक्षा जास्त पोटल्या बनवून ठेवू शकता. पोटली ठेवल्यानंतर तांदळाच्या डब्याचे झाकण नीट लावून ठेवा.

# ई-पीक नोंदणीमुळे भिवंडीतील शेतकऱ्यांच्या डोकेदुखीत वाढ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : प्रधानमंत्री पिक विमा घेण्यासाठी शेतकऱ्यांना शेतात जाऊन ई-पिक नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले मात्र शासनाने उपलब्ध करून दिलेला -पिक पाहणी अँप भिवंडी तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांना हाताळता येत नसल्याने शेतकऱ्यांची डोकेदुखी वाढली असुन शेतकऱ्यांनी आक्रोश व्यक्त केला आहे

प्रधानमंत्री पिक योजनेसह नुकसान भरपाई मिळण्यासाठी शासनाने मागील तीन वर्षापासून खरीप व रब्बी हंगामात लागवड केलेल्या पिकांची ई-पिक पाहणी बंधनकारक केली आहे. खरीप हंगामात लागवड केलेल्या पिकांच्या ई-पिक पाहणीच्या नोंदी अभियानास ऑगस्ट पासुन प्रारंभ झाला.असुन १४ सप्टेंबरपर्यंत नोंदणीची अंतीम मुदत दीली आहे. त्यामुळे भिंवडी तालुक्यातील शेतकरी दररोज शेतात ई-पिक नोंदणी करण्यासाठी मोबाईल अँपशी झगडावे लागत आहे तसेच जागेवर गेल्यावर मोबाईल रेंज नसणे, अँप सुरू होण्यास विलंब लागणे, शेतात उभे राहुन ई-पिक नोंदणी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्यांना अँप व्यवस्थित उघडता न येणे, धीम्या गतीने इंटरनेट सेवा असल्याने सतत लोंडीग, ऑनलाईन प्रक्रीया नॉलेज नसणे अशा अनेक अडचणींना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे. तसेच गुगल

**खरीप हंगामासाठी ऑनलाईन पध्दतीने पीक नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असुन इंटरनेट कमी गती, अँपमध्ये वारंवार येणाऱ्या तांत्रिक अडचणी व शेतकऱ्यांना अँप हाताळण्यासाठी प्रशिक्षणाचा अभाव, अनेक शेतकऱ्यांकडे अँड्रॉइड फोन नसणे, सर्वर डाऊन असणे यामुळे शेतकऱ्यांची नोंदणी प्रक्रिया रखडत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पिक विमा योजनेसह विविध योजनांपासून वंचित रहावे लागणार आहे.**

मॅपमध्ये शेतापासुन शेतापासुन गट नंबर सर्वे नंबर दुर दाखवले जात आहे. त्यामुळे त्या शेतीची नोंदणी पुर्ण होत नाही प्रधानमंत्री पिक विमा योजना अँग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी दिल्लीमार्फत राबवली जात आहे या तांत्रिक अडचणींमुळे शेतकऱ्यांना पिक विम्याचा लाभ वेळेत मिळण्यास अडथळा निर्माण झाला आहे. या सर्व अडचणीमुळे ई-पिक नोंदणी वेळेत पुर्ण न झाल्यास पिक विमा व ईतर योंजनापांसुन शेतकरी वंचित राहण्याची शक्यता असल्याने शेतकरी चिंतेत आहेत. शेतकरी बांधवांनी वेळेवर ई-पिक पाहणी पुर्ण न केल्यास शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे शासनाने तातडीने सोपी व सुलभ पध्दत उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी भिंवडी तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी केली आहे.

# रायगड जिल्ह्यात भाडेकरूंची माहिती पोलिसांना देणे बंधनकारक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : जिल्ह्यातील नागरिकांनी आपली घरे, दुकाने, फ्लॅट, फार्म हाऊस भाड्याने देताना किंवा विक्री करताना भाडेकरू व खरेदीदारांची संपूर्ण माहिती स्थानिक पोलीस ठाण्यात कळविणे बंधनकारक राहणार आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे. पोलीस अधीक्षक यांच्या अहवालानुसार, जिल्ह्यातील औद्योगिक वसाहती, फार्म हाऊस व शहरी भागात मोठ्या प्रमाणावर परप्रांतीय नागरिक नोकरी, व्यवसाय किंवा इतर कारणास्तव राहण्यासाठी घरे व फ्लॅट भाड्याने घेत आहेत. परंतु, याबाबत मालकांकडून स्थानिक पोलीस ठाण्यात वेळेवर माहिती दिली जात नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे गुन्हेगारी किंवा दहशतवादी कारवाया घडल्यास तपासात अडथळे निर्माण होतात.

यापूर्वीही रायगड परिसरातून भाडेकरू म्हणून राहणाऱ्या नक्षलवाद्यांना अटक झाल्याच्या घटना घडल्या आहेत. भविष्यात अशा प्रकारच्या घातपाती कारवायांना प्रतिबंध घालण्यासाठी प्रत्येक भाडेकरू किंवा खरेदीदाराची माहिती पोलीस स्टेशनकडे असणे अत्यावश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

नवीन आदेशानुसार मालमत्ता धारकांनी भाडेकरू अथवा खरेदीदार यांची नावे, पत्ते, संपर्क क्रमांक, ओळखपत्र व इतर संपूर्ण माहिती भाडेकरार किंवा विक्री झाल्यानंतर सात दिवसांच्या आत संबंधित पोलीस ठाण्यात देणे बंधनकारक असेल. आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ अंतर्गत दंडनीय कारवाई होणार आहे.

हा आदेश २६ ऑगस्टपासून पुढील दोन महिन्यांपर्यंत लागू राहणार आहे. नागरिकांनी स्वतःच्या सुरक्षिततेसाठी व कायद्याच्या अधीन राहून आवश्यक ती माहिती पोलीस ठाण्यात नोंदवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे केले आहे.






# रोहोकडी ग्रामसभेत गावकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : रोहोकडी (ता. जुन्नर) येथील ग्रामसभा मंगळवार दि. २६ रोजी हनुमान मंदिर सभामंडपात मोठ्या उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सरपंच सुभाष घोलप यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या ग्रामसभेला गावातील नागरिक, महिला व तरुण वर्गाचा उल्लेखनीय सहभाग होता.



ग्रामसभेत गावाच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण ठराव एकमुखाने मंजूर झाले. गावासाठी हवामान केंद्र मंजूर झाल्याने शेती व शेतकऱ्यांच्या दृष्टीने मोठा दिलासा मिळाला आहे. तलाठी कार्यालयाची जागे विषयी चर्चा झाली, तसेच प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीचे बांधकाम लवकरच सुरू होणार असून त्यासाठी गावठाण येथील जागा किंवा जिल्हा परिषद शाळेसमोरील जागा यांपैकी एक जागा निश्चित करण्याचा ठराव घेण्यात आला. यामुळे आरोग्य सुविधा गावाच्या दारी उपलब्ध होणार असल्याचे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

याशिवाय ग्रामपंचायत हद्दीतील विविध रस्त्यांची कामे, जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा, सार्वजनिक रस्त्यांवरील दिवाबत्ती व्यवस्था, तसेच स्मशानभूमी परिसर दुरुस्ती याबाबतही चर्चा होऊन ठोस निर्णय घेण्यात आले.

सामाजिक बांधिलकी व गावातील विविध बाबी विषयी व वाद मिटविण्यासाठी केलेल्या त्यांच्या चांगल्या कार्यामुळेच ग्रामस्थांनी त्यांच्यावर पुन्हा विश्वास टाकला असून महात्मा गांधी तंटामुक्त समितीच्या फेरनिवडीत पुन्हा एकदा सुनील शिंदे यांची अध्यक्षपदी, तर नवनाथ घोलप व नवनाथ मुरादे यांची उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. या निवडीदरम्यान उपस्थित ग्रामस्थांनी टाळ्यांच्या गजरात अभिनंदन केले.

यावेळी माजी सरपंच सुदाम घोलप, भगवान घोलप, सचिन घोलप, विद्यमान सरपंच सुभाष घोलप, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष पंकज घोलप, सोसायटीचे चेअरमन भगवान घोलप, व्हाईस चेअरमन शांताराम मुरादे, माजी सदस्य शिवशंकर घोलप, अमोल घोलप, दौलत घोलप, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष सुनील शिंदे, उपाध्यक्ष नवनाथ घोलप व नवनाथ मुरादे यासह शांताराम हिंगणे, दत्तात्रय मुरादे, अशोक घोलप, किसन घोलप, शांताराम शिंदे, अजित घोलप, निलेश घोलप, दिलीप घोलप, महेश मरादे, महेंद्र मुरादे, राहुल घोलप, नामदेव हिंगणे,भरत हिंगणे, दत्तात्रय हिंगणे, प्रीतम डुंबरे, तुषार घोलप, तेजस घोलप, अंकुश घोलप, विक्रम घोलप, विशाल घोलप,दीपक राऊत, पोपट घोलप,पोपट मुरादे, सार्थक घोलप,अक्षय घोलप, स्वप्निल घोलप, ओंकार घोलप, बबन मुरादे, नामदेव घोलप, काशिनाथ मुरादे, पंढरीनाथ घोलप, शांताराम घोलप, विष्णू मुरादे,सतीश घोलप,भानुदास घोलप, म्हातारबा घोलप, पोलिस पाटील विश्वजीत घोलप, कोतवाल विशाल वायाळ, आरोग्य अधिकारी सुनील यादव, मीरा सिरोसे, ज्योती ढोक, शीला घोलप, ग्रामसंघाच्या अध्यक्षा कल्याणी घोलप, सचिव वृंदा हिंगणे, सी.आर.पी. मनीषा घोलप, ग्रामसेवक अस्लम शेख, संगणक परिचालीका अनुराधा सोनवणे, ग्रामपंचायत कर्मचारी अमोल विठ्ठल घोलप आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या ग्रामसभेमुळे रोहोकडी गावाच्या सर्वांगीण विकासाचा पाया अधिक मजबूत झाला असून ग्रामस्थांनी गावाच्या प्रगतीसाठी एकदिलाने पुढाकार घेतल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले.

# पेणच्या बाजारपेठेत पर्यावरणपूरक मखरांना मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : राज्य सरकारने गणेशोत्सवाला दिलेल्या 'राज्य महोत्सवा'चा दर्जा लक्षात घेता, यावर्षीसुद्धा गणेशोत्सव धूमधडाक्यात साजरा केला जाईल. उत्सवासाठी भाविकांची जय्यत तयारी करीत आहेत. घरगुती गणेश पूजनासाठी मखरांची खरेदी सुरू आहे. पर्यावरणपूरक मखरांना सर्वाधिक मागणी आहे.

कागदापासून विविध आकारांचे तयार केलेले मखर, वेगवेगळ्या रंगांची कलाकुसर नागरिकांना अधिक पसंत आहे.प्लास्टिकचा वापर टाळण्याकडे लोकांचा कल आहे. शाडू मातीच्या मूर्तीसाठी आग्रह धरत इको-फ्रेण्डली मखरांचीसुद्धा भाविक मागणी करत आहेत. आकर्षक अशा तीन फूट उंचीच्या मखरांची किंमत दोन हजार पाचशे ते तीन हजारांपासून सुरू होते. आकार आणि रंगसंगतीच्या अनुषंगाने विविध मखरे ग्राहक खरेदी करीत आहेत. पेणच्या बाजारपेठत असलेल्या दुकानांमध्ये कृत्रिम फुलांची सुंदर आरास बघायला मिळते. सुटी कृत्रिम फुले, या फुलांचे हार, माळांपासून बनविलेले मखर पाहायला मिळतात. सध्या या कृत्रिम फुलांना सर्वाधिक मागणी आहे. कृत्रिम फुलांपासून मखरे निर्मिती करण्याकडेसुद्धा कल आहे. फुलांच्या माळाही उपलब्ध आहेत. त्यांच्या किमती २५० रुपयांपासून आहेत. अर्धगोल आकारातील फुलांचे मखर दोन हजारांपासून मिळत आहेत.

पर्यावरणपूरक मखरांची खरेदी करताना दुसऱ्या बाजूलाआकर्षक देखाव्यांमध्ये मंदिरांच्या आरासांनासुद्धा ग्राहकांची पसंती वाढत आहे. सिद्धिविनायक मंदिरापासून अगदी तिरुपती बालाजी मंदिरापर्यंत वेगवेगळ्या प्रकारची मंदिरे बाजारामध्ये ग्राहकांसाठी उपलब्ध आहेत. अष्टविनायक मंदिरांची प्रतिकृती दाखवणाऱ्या आरासची, बालाजी मंदिर, भवानी मंदिराची प्रतिकृती दर्शवणाऱ्या मखराची हजारो रुपये असून लहान आकारांच्या मूर्तीसाठी असलेल्या मंदिरांच्या देखाव्यांची किंमत तीन हजार रुपयांपासून सुरू आहे. पेणच्या बाजारपेठेत सर्वाधिक पसंती ही पर्यावरण पूरक मखरांना असल्याचे दिसून येते.

# अंबरनाथ नाट्यगृहास बहिणाबाई चौधरी यांचे नाव द्या – सुनील इंगळे





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : साऱ्या विश्वाला आपल्या काव्याने भारावून टाकणाऱ्या निसर्गकन्या बहिणाबाई चौधरी यांचा काव्यरूपी ठेवा अनमोल आहे. आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईंच्या प्रतिभारुपी साहित्याला अनमोल असा सोन्याच्या मोहरांचा हंडा असे म्हटले आहे. अरे संसार संसार पासून ते जगणं मरण एका श्वासाचे अंतर या व अशा हजारो ओवींनी बहिणाबाईंनी जगाला तत्त्वज्ञान शिकविले.आपल्या सहज व सोप्या काव्याने अनेकांना जगण्याची प्रेरणा दिली. अशा खानदेश कन्या बहिणाबाई चौधरी यांची सरकार दरबारी मात्र सतत उपेक्षाच होत आलेली आहे. त्यांची जयंती व पुण्यतिथी साजरी करण्यापासून ते त्यांच्या काव्याची,साहित्याची शासनातर्फे नेहमीच अनास्थाच दिसून आली आहे, बहिणाबाईंची कर्मभूमी सोडता महाराष्ट्रात इतर कुठेही दखल न घेता त्यांचे स्मारक अथवा एखाद्या नाट्यगृहाला नावही दिसून येत नाही. अंबरनाथ नगरपरिषदेच्या पूर्णावस्थेत येणाऱ्या नाट्यगृहास निसर्ग कन्या बहिणाबाई चौधरी यांचे नाव देण्याची मागणी आम्ही या पत्राद्वारे करीत आहोत. तसे निवेदन अंबरनाथ नगर परिषदेचे अतिरिक्त मुख्याधिकारी श्री शेळके साहेब व स्थानिक आमदार माननीय बालाजी किणीकर यांना सादर केले आहे. अंबरनाथ मधील सुजाण नागरिक, नाट्य रसिक या आमच्या मागणीला नक्कीच पाठिंबा देतील. तरी आपण या संदर्भात आमच्या मागणीला आपल्या ठरावात रूपांतर करून हजारो बहिणाबाई रसिकांची मागणी पूर्ण कराल या अपेक्षेमध्ये अशी मागणी बहिणाई चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष श्री. सुनील इंगळे यांनी केली आहे एकंदरीत असे आहे की ठीक ठिकाणी ठराविक तीच, तीच नावे रस्त्याला, गार्डनला, पुलाला इत्यादी ठिकाणी जाहीर केली जातात आणि तीच तीच परत,परत रिपीट होतात, परंतु भावी पिढीला आपल्या संस्कृतीची जोडली जाणारी, ज्ञात होणारी नावे आज लुप्त झाली आहेत. काही प्रकल्पांचा, प्रोजेक्ट बनवतानाच त्या प्रोजेक्टला कोणते नाव द्यायचे असे ठरलेले असते असे एका स्थानिक पुढाऱ्यांनी नाव न सांगण्याच्या अटीवर आपले मत व्यक्त केले. राजकारणी फक्त राजकारण करत असतात ही खंत त्यांनी व्यक्त केली.

# शाळेला संगणक भेट देऊन साजरा केला मित्राचा वाढदिवस

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : "मैत्री ही केवळ आनंद वाटण्यापुरती मर्यादित नसून समाजात चांगले कार्य करण्याची प्रेरणा देणारी असते," याचा उत्तम प्रत्यय जिल्हा परिषद केंद्र शाळा राहनाळ येथे पाहायला मिळाला. भानुदास भोईर यांचा वाढदिवस त्यांचे जिवलग मित्र शशिकांत भोईर यांनी विद्यार्थ्यांसोबत साजरा करून मैत्रीचा वेगळा संदेश दिला.या उपक्रमांतर्गत शाळेला एक संगणक भेट देण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना वह्या, केक, बिस्कीट व चॉकलेटचे वाटप करून मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्यात आला. शाळेतील मुलींनी पंचारतीने भानुदास भोईर यांचे औक्षण करून शुभेच्छा दिल्या.




या सोहळयास प्रभारी सरपंच प्रताप पाटील, माजी सरपंच डॉ. राजेंद्र भोईर यांच्यासह गावातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रताप पाटील यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, "मैत्री जपत समाज ऋण फेडत शाळेला संगणक भेट देणे हा समाजाप्रती जबाबदारीचा उत्तम आदर्श आहे. विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल साक्षरता वाढविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा आहे." डॉ. राजेंद्र भोईर यांनीही आपल्या शुभेच्छा व्यक्त करताना म्हटले की, "मैत्रीचा असा सामाजिक उपक्रम गावात सकारात्मक संदेश देणारा असून, मुलांना प्रोत्साहन देणारा आहे."

भानुदास भोईर यांनी आपल्या प्रतिक्रिया देताना सांगितले की, "माझा वाढदिवस शाळेतील मुलांसोबत साजरा होणे ही माझ्यासाठी आयुष्यातली अविस्मरणीय भेट आहे. मित्र शशिकांतने केलेल्या या उपक्रमामुळे माझा वाढदिवस समाजकारणाशी जोडला गेला. मुलांच्या आनंदी चेहऱ्यांमध्येच माझा खरा आनंद आहे." कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक अजय पाटील यांनी केले. सूत्रसंचालन राजश्री पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन अंकुश ठाकरे यांनी केले. हा उपक्रम केवळ वाढदिवसाचा सोहळा न राहता विद्यार्थ्यांसाठी आनंदाचा, तर समाजासाठी मैत्री आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव देणारा ठरला.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त भव्य मॅरेथॉनसह विविध कार्यक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिन २९ ऑगस्ट हा देशभर राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने जिल्हा प्रशासन व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने दिनांक २९ ते ३१ ऑगस्ट २०२५ या कालावधीत विविध क्रीडा विषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्यात क्रीडा व खेळांचा प्रसार व्हावा, युवक-युवतींमध्ये क्रीडाविषयक वातावरण निर्मिती व्हावी तसेच क्रीडा संस्कृतीचे संवर्धन व जतन व्हावे या हेतूने हा उपक्रम राबविला जाणार आहे.

२९ ऑगस्ट : सकाळी १० वाजता जिल्ह्यातील राष्ट्रीय व राज्य क्रीडा पुरस्कारार्थी तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंचा भव्य सत्कार.

३० ऑगस्ट : विविध शाळांमधून क्रीडा स्पर्धांचे आयोजन. तसेच संघटनांच्या माध्यमातून चर्चासत्र व परिसंवाद.

३१ ऑगस्ट : अलिबाग येथे – भव्य मॅरेथॉन स्पर्धा आयोजित. यामध्ये १५ वर्षाखालील मुले-मुली, १८ वर्षाखालील मुले-मुली, खुला गट (पुरुष व महिला) तसेच वरीष्ठ नागरिक, लोकप्रतिनिधी व शासकीय अधिकारी-कर्मचारी यांचा समावेश असेल.स्पर्धकांना प्रमाणपत्रे तर विजेत्यांना आकर्षक ट्रॉफीज देण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने खेळाडूंनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी केले आहे.




**मेष**

तुम्हाला सोने-चांदीच्या व्यवसायात मोठा आर्थिक फायदा होईल. आज तुम्ही तुमची वैयक्तिक कामे आणि व्यावसायिक कामे पूर्ण कराल.

**वृषभ**

तुम्ही एक नवीन काम सुरू कराल, ज्यामुळे तुम्हाला चांगला नफा मिळेल. आज तुम्ही तुमच्या पालकांसोबत धार्मिक स्थळी जाऊ शकता,.

**मिथुन**

आर्थिक बाजू मजबूत असेल, ज्यामुळे तुम्ही काहीतरी मोठे करण्याचा विचार करू शकता.कोणताही निर्णय घेण्यापूर्वी, नीट विचार करा. लेखकांना आज एक

**कर्क**

कामे पूर्ण करू शकाल, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. बॉस तुम्हाला एका नवीन प्रोजेक्टची जबाबदारी देऊ शकतात, जी तुम्ही चांगल्या प्रकारे पूर्ण कराल.

**सिंह**

आज सामाजिक उपक्रमांमध्ये तुमची उपस्थिती आणि विचार प्रशंसनीय असतील.तुम्हाला व्यवसायात मोठा आर्थिक फायदा होईल, ज्यामुळे तुम्ही आनंदी राहाल.

**कन्या**

मानसिक शांती मिळेल.तुमचे व्यावसायिक व्यवहार सुरळीत सुरू राहतील, आज ऑफिसमध्ये कामाची प्रशंसा होईल आणि बॉस बढतीबद्दल बोलू शकतात.

**तूळ**

चांगली कविता लिहावीशी वाटेल. आज, तुमच्या वैवाहिक जीवनात खूप आनंद असेल. तुम्हाला व्यवसायात चांगला नफा मिळेल.

**वृश्चिक**

भागीदारीत व्यवसाय सुरू करू शकता, भविष्यात तुम्हाला चांगला नफा मिळेल. सामाजिक कार्यात गुंतलेले सामाजिक कल्याणासाठी कार्य कराल.

**धनु**

कोणत्याही विषयावर जोडीदाराचा सल्ला घेऊ शकता. एखाद्या प्रकल्पासाठी बाहेर अधिकृत यात्रेला जावे लागू शकते, म्हणून सर्व तयारी नीट करा.

**मकर**

घरातील वातावरण गोड आणि आल्हाददायक राहील. महिला घरातून एखादे काम सुरू करू शकतात, ज्यामध्ये त्यांना कुटुंबाचा पूर्ण पाठिंबा मिळेल.

**कुंभ**

व्यावसायिक संबंध मजबूत होतील. या राशीच्या लोक जे परदेशात जाण्याचा विचार करत होते, त्यांना आज तुम्हाला कोणाची तरी मदत मिळेल.

**मीन**

इच्छित ठिकाणी बदली होईल,व्यवहारांमध्ये सर्वकाही नीट तपासले पाहिजे आणि कर्मचाऱ्यांशी चांगले वागले पाहिजे.नवीन संधी मिळतील,




# दर्जेदार सुविधा देण्यासाठी प्रशासन सदैव प्रयत्नशील

## - जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील खेळाडूंसाठी दर्जेदार सुविधा देण्यासाठी प्रशासन सदैव प्रयत्नशील आहे असे गौरवोद्गार जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात आयोजित राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त जिल्ह्यातील पुरस्कार प्राप्त खेळाडूंच्या सन्मान प्रसंगी काढले. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, पुरस्कार प्राप्त खेळाडू व त्यांचे नातेवाईक उपस्थित होते.यावेळी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ म्हणाले की, खेळाडूंना प्रोत्साहन देण्यात यावे. जिल्ह्यातील खेळाडूंसाठी ज्या प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध आहेत त्यामध्ये वाढ होणे आवश्यक आहे. खेळाडूंचा कल पाहून त्यांना सर्व प्रकारच्या सोयी सुविधा पुरविण्यात येतील. जिल्ह्यातील खेळाडूं बरोबर संवाद साधण्यासाठी एक कार्यक्रमाचे आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेल्या खेळाडूंची नोंदणी करावी. ग्रामीण भागातील तालुका क्रीडा संकुलामध्ये सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. खेळाडूंना शासकीय सेवेत सुध्दा प्राधान्य देण्यात येते.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते पुरस्कार प्राप्त खेळाडूंचा सन्मान करण्यात आला.पवन मुकुंद भोईर (जिम्नॅस्टिक्स),संयुक्त प्रसेन काळे (रिदमिक जिम्नॅस्टिक्स ),आर्यन भालचंद्र जोशी (बुध्दीबळ), धर्मेंद्रकुमार यादव (पॉवर लिफ्टिंग), .उदय उमेश उतेकर (जलतरण वॉटरपोलो), अपूर्वा महेश पाटील (ज्युदो), अजित कारभारी, कुमारी शौर्या आंबुरे (मैदानी खेळ-हर्डल्स),शरद कुलकर्णी जेष्ठ गिर्यारोहक यांचा जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते शाल, ट्रॉफी देवून सन्मान करण्यात आला.यावेळी पुरस्कार प्राप्त खेळाडूंनी आपले मनोगत व्यक्त केले.

# सतिश बोबडे यांनी घरगुती गणेशोत्सवात साकारला निसर्गाचा देखावा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पश्चिमेतील जोशिबाग येथील रहिवासी सतिश बोबडे यांच्या घरगुती गणेशोत्सवात निसर्गाचा देखावा साकारण्यात आला आहे. यंदा या गणेशोत्सवाचे ३७ वे वर्ष असून या सजावटीमध्ये एक सुंदर ग्रामीण दृश्य दर्शविले. डोंगर, हिरवीगार झाडे, झोपड्या, शेतात काम करणारे शेतकरी, जनावरे आणि खेळणारी मुले या सर्व गोष्टींनी ग्रामीण जीवनाचा निसर्गरम्य अनुभव दिला आहे. दूरवर उंच डोंगराच्या पार्श्वभूमीत धुक्याची छटा आहे जी सकाळच्या शांत वातावरणाची झलक देते. मध्यभागी एक मोठे झाड उभे आहे, ज्याच्या फांद्यांवर पसरलेली हिरवळ संपूर्ण परिसराला जीवन देत आहे. झाडाच्या खाली गणपती बाप्पा विसावले असता त्यांच्या मागे सुंदर अशा पदरगडाचे दर्शन होत आहे. पलीकडच्या बाजूला शिवगर्जना गिरी भ्रमण संस्था कल्याण यांचे डोंगरावरून रॅपलिंग चालु आहे असा सुंदर देखावा साकारला आहे. हि सजावट दिनेश दहिवलकर यांनी केली असून यासाठी बोबडे परिवाराने सहाय्य केले आहे.

# जीवनदीप महाविद्यालयात पर्यावरणपूरक गणेशमूर्ती स्पर्धा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

गणेशउत्सव जवळ आला की अनेक सामाजिक माध्यमे तसेच समाज माध्यम यांच्यावर एक मुद्दा नेहमी झळकताना दिसतो तो म्हणजे पर्यावरण पूरक गणपती! बाप्पा इको फ्रेंडली गणपती बाप्पा! विद्यार्थ्यांच्यात पर्यावरणाविषयी आवड निर्माण व्हावी, त्यांची नाळ ही आधुनिक युगात देखील पर्यावरणाशी जोडलेली राहावी या उद्देशाने जीवनदीप महाविद्यालयात दिनांक २६- ०८- २०२५ रोजी सांस्कृतिक विभाग , पर्यावरण दक्षता मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जीवनदीप कनिष्ठ , वरिष्ठ महाविद्यालय तसेच निर्मल इंग्लिश मीडियम स्कूल या तिन्ही ज्ञान संकुलातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. व श्री गणेशाच्या अतिशय सुबक व सुंदर मूर्ती विद्यार्थ्यांनी बनवल्या. सदर कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे मानवी जीवनात असलेले महत्त्व, निसर्गपूजेचे



महत्त्व इत्यादी विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी सुभाष इसामे (समन्वयक निसर्गयान मामनोली) हे उपस्थित होते जीवनदीप महाविद्यालयाचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे ,प्राचार्य. डॉ.अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य. प्रकाश रोहणे, निर्मल इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका. भावना कुंभार, सांस्कृतिक विभाग प्रमुख. प्रा. सतीश लकडे, NSS विभाग प्रमुख. प्रा. दिनेश धनगर व इतर प्राध्यापक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी बनवलेल्या श्री गणेश मूर्तीचे परीक्षण अध्यक्ष, प्राचार्य व सुभाष इसमे यांनी केले व यातूनच रूपा राजकुमार शर्मा (प्रथम क्रमांक) श्रेया अखिलेश जयस्वाल (द्वितीय क्रमांक) नीरज हेमंत जाधव (तृतीय क्रमांक), लहान गटांमध्ये निशान देवकर (प्रथम क्रमांक), निष्ठा सावेकर (द्वितीय क्रमांक), वरिष्ठ महाविद्यालयातून आदिती मनोहर वारीक (प्रथम क्रमांक) या विजय विद्यार्थ्यांना अध्यक्ष रवींद्र घोडविंदे यांनी बक्षीस देऊन सन्मानित केले व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. महाविद्यालयातील NSS विभागातील स्वयंसेवक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सर्वांच्या सहकार्यातून सदर पर्यावरण पूरक श्री गणेश मूर्ती बनवण्याची स्पर्धा यशस्वीरित्या संपन्न झाली.

# गाडगे महाराज विद्यालयात गणपती बाप्पाचे आगमन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : गाडगे महाराज विद्यालयात गणेशोत्सवाचे मंगलमय वातावरण निर्माण झाले आहे. आज सकाळी बरोबर ९ वाजता ढोल-ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या आतषबाजीत आणि जल्लोषपूर्ण घोषणाबाजीमध्ये गणरायाचे आगमन मोठ्या उत्साहात झाले. इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांनी ओतूर नगरीतील मेन बाजारपेठेतून गणपती बाप्पाला वाजत गाजत, नाचत-गात शाळेत आणले. शाळेच्या



मुख्य प्रवेशद्वारावर फटाक्यांच्या रोषणाईत गणपती बाप्पाचे स्वागत करण्यात आले. “गोपाला गोपाला देवकी नंदन गोपाला” या भक्तिगीताच्या सुरेल गजरात गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली. मुख्याध्यापक संपत माने यांनी सपत्नीक गणपती बाप्पाची विधिवत पूजा करून श्रीची स्थापना केली.

या निमित्ताने विद्यालयात विविध धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भजनांचे सादरीकरण, विविध स्पर्धा, मार्गदर्शन व्याख्याने तसेच करिअर मार्गदर्शन सत्रांचे आयोजन पुढील काही दिवसांत होणार आहे. तसेच गणपती विसर्जन मिरवणूक ही अतिशय भव्य आणि दिमाखदार पद्धतीने काढली जाईल, असे मुख्याध्यापक संपत माने यांनी सांगितले.या सोहळ्याला विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षक प्रतिनिधी मनिषा पाटील तसेच अनेक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण वातावरणात भक्ती, आनंद आणि उत्साहाचे अनोखे मिश्रण पाहायला मिळाले. या कार्यक्रमाचे सुंदर क्षणचित्रण छायाचित्रकार तुषार पानसरे यांनी केले. संपूर्ण आयोजन आणि माहिती जेष्ठ शिक्षक प्रदीपकुमार मिरगे यांनी दिली.

गाडगे महाराज विद्यालयाचा हा गणेशोत्सव भक्ती, संस्कार आणि संस्कृती यांचा मिलाफ ठरत असल्याचे सर्व उपस्थितांनी गौरविले.

# टिटवाळा-आंबिवली दरम्यान मध्य रेल्वेची वाहतूक कोलमडली



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : टिटवाळा आंबिवली दरम्यान मालगाडीच्या इंजिनमध्ये बिघाड झाल्याने मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली होती. टिटवाळा आंबिवली दरम्यान गुरुवारी पावणे बारा वाजण्याच्या सुमारास कसारा कडून मुंबईच्या दिशेकडे जाणर्या मालगाडीच्या इंजिनमध्ये बिघाड झाल्याने मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली होती. या बिघाडामुळे कल्याणहून टिटवाळयाकडे जाणारी रेल्वे सेवा अर्धा तास उशिराने धावत होती. तर टिटवाळयाहून कल्याणकडे येणाऱ्या रेल्वे सेवा पूर्णपणे ठप्प झाल्या होत्या.

घटनेची माहिती मिळताच रेल्वे प्रशासनाने युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरू करत तब्बल दीड तासाने कल्याणहून दुसरे इंजिन पाठवून मालगाडी बाजूला करण्यात आली. यानंतर रेल्वे वाहतूक सुरळीत झाली. या मालगाडीच्या इंजिन बिघाडामुळे या रेल्वे मार्गावरील मेल एक्स्प्रेस, लोकल सेवेला उशीराला सामोरे जाण्याची वेळ आली. तर दीड दिवसाच्या गणपती बाप्पाचे दर्शनासाठी बाहेर पडलेल्या रेल्वे प्रवाशांना उशीरा झाल्याने त्यांची तारांबळ उडल्याने रिक्षा बसचा प्रवास करावा लागला.

# केडीएमसीच्या लेखी आश्वासनानंतर श्रमिक जनता संघाचे आंदोलन तात्पुरते स्थगित

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : १५ सप्टेंबरच्या आधी किमान वेतनाच्या थकीत फरकाची रकमेबाबत प्रकरण निकाली काढण्याचे आश्वासन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी श्रमिक जनता संघ युनियनच्या शिष्टमंडळाला दिल्याने धरणे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आल्याची माहिती युनियन सचिव सुनील कंद यांनी दिली आहे.

२४ फेब्रुवारी २०१५ पासून महाराष्ट्र शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामगारांना सुधारित किमान वेतन लागू केले होते. मात्र कल्याण डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाने घंटागाडी, डम्पर प्लेसर आदी गाड्यांवरील कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन अदा केले नव्हते. श्रमिक जनता संघ युनियनचे सरचिटणीस जगदीश खैरालिया यांच्या पाठपुराव्यामुळे शेवटी महापालिका प्रशासनाला किमान वेतन कायद्यानुसार वेतन लागू करणे भाग पडले. २०१५ ते २०२३ या काळातील सुधारित किमान वेतनाच्या फरकाची थकीत सुमारे सात कोटी रक्कम अदा करण्याचे तात्कालिक महापालिका आयुक्त यांनी आदेश दिले असतानाही महापालिका प्रशासनाकडून टाळाटाळ सुरू आहे. म्हणून मंगळवारी आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता.

सोमवारी अतिरिक्त आयुक्त यांच्या दालनात झालेल्या बैठकीत अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी सर्व प्रक्रिया पूर्ण करून श्रमिक जनता संघ युनियन सोबत चर्चा करून सदर रक्कम वाटप बाबतीत अंतिम निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन शिष्टमंडळाला दिले आहे. बैठकीत अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिग्विजय चव्हाण, उप आयुक्त बोरकर, घुटे, नाना ठाकरे आदी अधिकारी महापालिका प्रशासनातर्फे उपस्थित होते. तर श्रमिक जनता संघ युनियनच्या वतीने सचिव सुनील कंद, सचिन कासार, बापू ओव्हाळ, हरेश ढमाले, समीर दरेकर, शाम गायकवाड, गोरखनाथ धोंदवड कामगार प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी "ह" प्रभागातील जून २०१९ ते २०२३ पर्यंतच्या हिशोबासह अहवाल सात दिवसांत सादर करण्याचे लेखी आदेश ही "ह" प्रभागक्षेत्राचे सहाय्यक आयुक्त यांना देण्यात आले आहेत. ज्या कामगारांना वयोमानानुसार कामावरून कमी करण्यात आले आहे, त्यांना त्यांच्या सेवा कालावधी नुसार उपदानाची रक्कम अदा करण्याबाबत ही चर्चा करण्यात आली होती.

# दीक्षाभूमी ते चैत्यभूमी धम्मयात्रा

## आज कल्याणात दाखल होणार




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : दीक्षाभूमी, नागपूर येथून निघालेली “धम्मध्वज यात्रा” तसेच भंते ज्ञानज्योती महास्थवीर (ताडोबा अभयारण्य टायगर बेल्ट,चंद्रपूर), भंते विनाचार्य व त्यांचा संपूर्ण संघ हे ऐतिहासिक कल्याण नगरीत शुक्रवारी २९ ऑगस्ट रोजी आगमन करीत आहेत.

महाबोधी महाविहार मुक्तीच्या कार्यासाठी, महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या विजयासाठी आणि समाजाच्या अस्मितेच्या रक्षणासाठी ज्या धम्मयोध्याने आपल्या जीवाची पर्वा न करता, अन्यायाच्या बेड्यात ६८ दिवस गया जेलमध्ये राहून महाबोधी महाविहार मुक्ती संघर्षाची ज्योत प्रज्वलित ठेवली त्या भंते विनाचार्य यांच्या अद्वितीय कार्याला वंदन करून या प्रसंगी जाहीर परिसंवाद व धम्मदेशना आयोजित करण्यात आली आहे. शुक्रवारी दुपारी १२ वाजता बालाजी लॉन्स, निक्कीनगर, अग्रवाल कॉलेज रोड, कल्याण (पश्चिम) येथे हि धम्मयात्रा येणार आहे. कार्यक्रमाच्या ठिकाणी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# रायगड जिल्ह्यात १ लाख २ हजार ४८४ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना

## गावागावात चैतन्यमय वातावरण



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रायगड जिल्ह्यात गणेश उत्सव आनंदमय वातावरणात साजरा होत असून जिल्ह्यामध्ये तब्बल १ लाख २हजार ४८४ गणेश मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली असून त्यामध्ये १ लाख २ हजार १९८ खाजगी मुर्तींचा समावेश असून २८६ सार्वजनिक आहेत. दीड दिवसाचे १२ सार्वजनिक तर २५ हजार ५३९ खाजगी गणरायाच्या मूर्ती आहेत. तसेच गौरी गणपती पर्यंतचे ८५ सार्वजनिक आणि ५६ हजार ३८३ खाजगी तर दहा दिवसांचे १६९ सार्वजनिक आणि १८ हजार ४२ खाजगी गणेशमूर्तींचे जिल्ह्यात आगमन झाले असून पाचव्या दिवशी १६ हजार १७५गौरीचे आगमन होणार आहे.

गणरायाच्या आगमनानंतर पाचव्या दिवशी गौरीचा मुक्काम ही गणेश भक्तांच्या घरी राहणार आहे. बाप्पाच्या आगमनाचे पूजन झाल्यानंतर अतिशय उत्साह पूर्ण वातावरणामध्ये बाप्पाचे मनोभावे दर्शन घेतले. बापाच्या आगमनाने रायगड जिल्ह्यात चैतन्यमय वातावरण निर्माण झालेले पाहावयास मिळाले.

आज दीड दिवसाच्या गणरायाला मनोभावे देण्यात आला. यावेळी गावा गावातून वाड्या वाड्यातून शहरातून भजन म्हणत भाविक भक्तांनी गणरायाला निरोप दिला.

# शालेय साहित्याचा वापर करून बाप्पांची आरास

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाशिंद : अ ब क ड ई या बाराखडीचा वापर कररून बनविलेले गणपत्ती बाप्पाचे मखर बच्चे कंपनीसाठी आकर्षण ठरले आहे.

बाजारात मिळणारे विविध प्रकारचे मखर खरेदी करण्यात गणेश भक्तांचा कल जास्त असल्याचे दिसून



येत आहे. विविध प्रकाच्या मुजीक लाईट वापरून मखराची शोभा वाढविण्याचा कल भक्तांमध्ये जास्त असल्याचे दिसून येत आहे. अनेक मंडळांनी मंदिराच्या प्रतिकृती बनवून गणेश भक्तआंना आकर्षीत करण्याचा प्रयत्न केल्याचेही दिसून येत आहे. मात्र या सर्वाला चाट देत दिलीप भोपतराव यांनी मराठी व बाराखडी पासून दुर जाणा-या शालेय मुलांना बाराखडीची गोडी लागावी, शालेय साहित्यांची ओळख व्हावी हा दृष्टीकोन डोळ्या समोर ठेऊन शालेय साहित्याचा वापर करून बनविले मखर बाल गणेश भक्तांचे लक्ष वेधून घेत आहेत.




# छत्रपतींच्या विचारांवर चालणाऱ्या मराठ्यांवर गोळ्या घालणार का?

## - शिवनेरीवरून जरांगेंचा सवाल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

जुन्नर : मराठा आरक्षणासाठी सुरू असलेली लढाई आता आरपार होईल. गरीब मराठा समाजाच्या लेकरांच्या वेदनांना न्याय मिळवण्यासाठी ही लढाई असून, शासनाने मराठा समाजाचा अपमान न करता त्यांना आपलेसे करावे, असे आवाहन मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केले.



शिवनेरी किल्ल्याच्या पायथ्याशी झालेल्या सभेत बोलताना जरांगे म्हणाले की, “छत्रपतींच्या विचारावर चालणारे सरकार छत्रपतींच्या विचारांवर चालणाऱ्या मराठ्यांवर गोळ्या घालणार का? आम्ही कायदा मोडत नाही, न्यायालयाने सांगितलेले नियम पाळूनच आमचे आंदोलन सुरू आहे. तरीही सरकारने आमच्या आंदोलनाला हात घातला तर माझा समाज राज्यभर आहे,” असा इशारा त्यांनी दिला.

ते पुढे म्हणाले की, “आरक्षणासाठी आम्ही जीव देऊ, पण मागे हटणार नाही. एक दिवसाचे उपोषण करा म्हणता, मग एका दिवसात आम्हाला आरक्षण का देत नाही? माझ्या समाजाचा वारंवार अपमान होतो कारण मी ‘मॅनेज’ होत नाही, हे त्यांना सहन होत नाही. आमच्या आंदोलनामुळे गणेशोत्सवात अडथळा होत असल्याचा आरोप होतोय, पण अडथळा करण्यासाठी आमच्या हातात बंदुका नाहीत.”

जरांगे यांनी हिंदू सणांच्या काळातच सरकारने लाठीचार्ज केले यावरूनही सरकारवर टीका केली. “गणपतीच्या वेळी आम्ही आंदोलन करत नाही असं नाही, पण सरकारलाच लाठीचार्ज करायला सोयीचे वाटते,” असे ते म्हणाले.

जुन्नर येथे आगमन झाल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी शिवाई मंदिरात जाऊन देवीची आरती केली आणि शिवजन्मभूमीवर नतमस्तक झाले कपाळी शिवनेरीची माती लावली.

अंतर्वली सराटीतून मुंबईच्या दिशेने निघालेल्या या आंदोलनादरम्यान गुरुवारी पहाटे जरांगे पाटील यांचे पुणे जिल्ह्यात भव्य स्वागत करण्यात आले. आणे, पेमदरा, बेल्हे, राजुरी, आळे, कोळवाडी, आळेफाटा, ओतूर, जुन्नर आदी ठिकाणी सकल मराठा समाजाच्या वतीने फुलांची उधळण, फटाक्यांची आतषबाजी आणि “एक मराठा लाख मराठा”, “मनोज जरांगे पाटील पुढे चला, आम्ही तुमच्या सोबत आहोत” अशा घोषणा देत स्वागत झाले. हजारो वाहनांच्या ताफ्यासोबतच दिवसभर रात्रभर महामार्गावर मराठा बांधवांचा जयघोष सुरू होता. पुणे जिल्ह्यात प्रवेश झाल्यापासूनच सर्वत्र आंदोलकांसाठी पाणी, बिस्किटे, दूध, जेवण यांची व्यवस्था करण्यात आली होती, तसेच आळेफाटा,ओतूर, जुन्नर परिसरातील मंगल कार्यालयांमध्ये व विविध ठिकाणी निवासाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली.

(आरक्षणाच्या मागणीसाठी निघालेल्या रॅलीत सहभागी असलेले सतीश ज्ञानोबा देशमुख (वय ४५, रा. वरडगाव, ता. केज, जि. बीड) यांना तब्येत बिघडल्याने नारायणगाव येथील रुग्णालयात दाखल केले असता, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला)

# रायगड जिल्ह्यात विनापरवाना ड्रोन वापरास बंदी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : जिल्हा पोलीस कार्यक्षेत्रातील संवेदनशील भागांमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पुढील दोन महिन्यांसाठी जिल्ह्यात (पोलीस अधीक्षक रायगड कार्यक्षेत्रात) पोलीस विभागाची पूर्वपरवानगी शिवाय ड्रोन कॅमेऱ्याचा वापर करण्यास बंदीचे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत. पोलीस अधीक्षक यांच्या अहवालानुसार, जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, धरणे, केंद्रीय संस्था तसेच समुद्रालगतचे भाग हे दहशतवादी कारवायांसाठी संवेदनशील आहेत.पूर्वी देशातील विविध भागात दहशतवादी व विघातक कारवायांसाठी ड्रोनचा वापर झाल्याची उदाहरणे आहेत. रायगडमध्ये रात्रीच्या वेळी अनधिकृत ड्रोन उडवल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.ड्रोनद्वारे टेहळणी करून दहशतवादी हल्ले होण्याची शक्यता तसेचचोरी व अन्य गुन्ह्यांसाठी ड्रोनच्या माध्यमातून माहिती संकलनाची शक्यता आणि ड्रोनद्वारे केलेले चित्रिकरण विघातक कृत्यांसाठी वापरले जाण्याचा धोका लक्षात घेता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये हा आदेश जारी केला आहे.ड्रोन कॅमेऱ्याचा वापर करावयाचा असल्यास व्यक्ती, संस्था वा आयोजकांनी ७ दिवसांपूर्वी स्थानिक पोलीस ठाण्याला माहिती देवून परवानगी घेणे बंधनकारक राहील. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ नुसार कारवाई करण्यात येईल असे जिल्हाधिकारी जावळे यांनी स्पष्ट केले आहे.हा आदेश नागरिकांच्या सुरक्षेसाठी व कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक असून, दोन महिन्यांसाठी संपूर्ण रायगड जिल्ह्यात विनापरवाना ड्रोन वापरावर बंदी लागू राहील.

# जुगारमुक्त व व्यसनमुक्त गणेश उत्सवाचा संकल्प करू या !

मुरबाड तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण ठाणे जिल्ह्यात गेली 25 ते 30 वर्ष अध्यात्मिक क्षेत्रात परमोच्च ज्ञान संपादन करून त्या ज्ञानाचा उपयोग सामाजिक उत्थानासाठी, जागृतीसाठी, त्याच बरोबर परमेश्वर व त्याची भक्ती कशी करावी याची साध्या, सोप्या शब्दात मांडणी करून वारकरी संप्रदायाचे विचार, ज्ञानोबांची ज्ञानेश्वरी, तुकोबांची अमृतवाणी घराघरात पोहोचवणारे थोर प्रवचनकार तथा किर्तनकार ह.भ.प धनाजी महाराज गायकर यांनी श्रीगणेश उत्सवात फोफावलेली विषवल्ली वर शाब्दिक प्रहार केला आहे.

श्री गणेश (गणपती) ही बुद्धीची देवता, एरव्ही आपण मंदिरात जाऊन दर्शन करत असतो. परंतु भाद्रपद चतुर्थीला प्रत्यक्ष देवच आपल्या घरी येताना आपण पाहतो, पण जुन्या समजुती किंवा अंधश्रद्धा म्हणा, लोक देवाला रात्रभर जागरण करतात हे मला तरी माहीत नाही कुणी सांगितलं आहे, वास्तविक विचार केला तर टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव कशासाठी सुरू केला आहे हे माहीत असूनही बरेच शिक्षीत लोक जागरण करण्यासाठी चक्क देवासमोर पत्ते खेळताना दिसतात, हे कीतपत योग्य आहे,आणि काही मंडळी तर तीथेच गुटखा, सिगारेट, तंबाखू इ.वाईट गोष्टीचे सेवन करतात तर काही महाशय दारु ढोसून देवासमोर पत्ते कुटीत बसतात हे सर्व कुठेतरी थांबले पाहिजे. पुढील पीढी बिघडविण्याचे काम सध्या समाजात चालले असून हे थांबले पाहिजे अशी आर्त साद, उपदेश त्यांनी या माध्यमातून समाजाला दिला आहे. याला काही वारकरी मंडळी सुध्दा अपवाद नाही गळ्यात माळा घालून बुका लावणारे,टिळा लावणारे देखील जुगार खेळण्यात पुढे असतात. मला यांना सांगायचे आहे की देवाला जागवायची काही गरज नाही, देवाला झोपायची गरज आहे. तेव्हा गेले ११ वर्षे मी सर्व माध्यमातून सांगत आहे ,देव नाही आणला तरी चालेल पण आणून समोर जुगार खेळणे आणि व्यसन करणं हे पाप आहे,म्हणून यावर्षी आपण संकल्प करू या की जुगारमुक्त व व्यसनमुक्त गणेश उत्सव साजरा करण्याचा महत्वपुर्ण संदेश या माध्यमातून त्यांनी समाजाला त्यांनी दिला आहे.



**- ह.भ.प धनाजी महाराज गायकर..**

# वृद्धाश्रमातील नागरिकांना गणेश मुखदर्शनाचा सन्मान

## धामणकर नाका गणेशोत्सव मंडळाचा उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी शहरात एकात्मतेचा राजा म्हणून गौरविल्या जाणाऱ्या धामणकर नाका मित्र मंडळाच्या ३७ व्या सार्वजनिक गणेशोत्सवाचे मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले.मातोश्री वृद्धाश्रमातील जेष्ठ नागरिक वृद्धांना प्रथम गणेश दर्शनाचा सन्मान देऊन पार विधीवत कार्यक्रमास सुरवात करण्यात आल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष संतोष शेट्टी यांनी दिली. यंदा असून उत्तर प्रदेश येथील इस्कॉन चंद्रोदय मंदिराची हुबेहूब पर्यावरणपूरक 130 फूट उंचीची प्रतिकृती बनविण्यात आली आहे.मंदिराच्या गाभाऱ्यात पर्यावरणपूरक कागदी लगदा व शाडूची माती या पासून बनविलेली 14 फूट उंचीची विलोभनीय गणरायाची मूर्ती विराजमान करण्यात आली आहे. गणरायास 25 किलो चांदी पासून बनवण्यात



आलेले आभूषण परिधान करण्यात आले आहेत.या सजावट देखाव्याचे उद्घाटन जेष्ठ समाजसेवक आर सी पाटील यांच्या तर गणेशभक्तांच्या सुरक्षेसाठी लावण्यात आलेल्या २५ सीसीटीव्ही कॅमेरा प्रक्षेपणाचा शुभारंभ भिवंडी पोलिस उपआयुक्त शशिकांत बोराटे यांच्या हस्ते करण्यात आले.

### १३० फूट उंचीची इस्कॉन मंदिराच्या प्रतिकृतीची उभारणी

यांप्रसंगी आमदार महेश चौघुले,सहाय्यक पोलिस आयुक्त विजय मराठे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक रत्नपारखी,भिवंडी इस्कॉन मंदिराचे प्रमुख श्री सुदामा,राजेश शेट्टी,तारु जाधव,संजय भोईर,मोहन बलेवार,संतोष जम्पाल,राकेश पटवारी,रवी गुज्जा अदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी मंडळाचे उपक्रमाचे कौतुक करून शहरातील गणेशोत्सव उत्साहात पण शांततेत साजरा करण्याचे आवाहन भिवंडी पोलिस उपआयुक्त शशिकांत बोराटे यांनी केले.याप्रसंगी

**गणेशोत्सव दरम्यान रक्तदान शिबिरात रक्तदात्यांना दहा लाख रुपयांचा अपघाती विमा भेट दिला जाणार आहे.तर नेत्र चिकित्सा शिबिरात मोतीबिंदू असलेल्या रुग्णांची मंडळा तर्फे मोफत शस्त्रक्रिया करून दिली जाणार आहे अशी माहिती यावेळी मंडळाचे अध्यक्ष संतोष शेट्टी यांनी दिली आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी मंडळाचे पदाधिकाऱ्यांच्या हस्ते उपस्थित पाहुणे व जेष्ठ नागरिकांचा मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.**

उपस्थितीत पाहुण्यांचे हस्ते महाआरती करून गणेश वंदना करण्यात आली.तसेच मातोश्री वृद्धाश्रमास मंडळातर्फे औषधांसह भोजन साहित्याचे ३७ सेट भेट देण्यात आले. यावेळी पुणे येथील एंजल्स डान्स ग्रुप च्या बाल कलाकारांनी नृत्याविष्कार सादर केले.

# अखेर डोंबिवलीतील मूर्तिकाराला अटक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ डोंबिवली : गणेशोत्सवाच्या एक दिवस आधी आनंदी कला केंद्राचा मूर्तिकार प्रफुल्ल तांबडे (वय 28) हा गणेशभक्तांची अडचण करून अचानक पसार झाला होता. या घटनेमुळे गणेशभक्त मोठ्या अडचणीत सापडले होते. याप्रकरणी विष्णुनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांची पथक प्रफुल्ल याचा शोध घेत होती. अखेर सातारा येथून तांबडे याला ताब्यात घेतल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक राम चोपडे यांनी दिली.डोंबिवली पश्चिमेतील महात्मा फुले रोडवरील चिनार मैदानाजवळ आनंदी कला केंद्र आहे. येथे दोन मंडपांमध्ये मूर्ती बुकिंगसाठी व्यवस्था करण्यात आली होती. आनंदी कला केंद्रातून अनेक गणेशभक्तांनी मूर्तीची नोंदणी केली होती. मात्र, प्रफुल्ल याने क्षमतेपेक्षा जास्त ऑर्डर्स स्वीकारल्या आणि कामाचा भार पेलता न आल्याने सोमवारी रात्रीपासून अचानक तो गायब झाला होता.

# मुंबई-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर खड्ड्यामुळे अपघातांची भिती

## रस्ता लवकर दुरूस्त करण्याची वाहनचालकांची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील पडघा टोल नाका अंतर्गत असलेल्या मुंबई नाशिक राष्ट्रीय महामार्गावर असंख्य खड्डे पडल्याने अपघाताची भिती व्यक्त करण्यात येत आहे

ऐन गणेशोत्सवात राष्ट्रीय महामार्गावर खड्डयांचे विघ्न पसरल्याने वाहन चालकांच्यात संताप व्यक्त होत आहे.पडघा टोलनाका ते वांसीद दरम्यान टोलनाक्याजवळ, डोहळे, कोंशीबी, कासणे, कादंळी येथे महामार्गावर असंख्य खड्डे पडले असुन हे खड्डे पावसाच्या पाण्याने भरल्याने





वाहन चालकांना वाहन चालवताना ऐन गणेशोत्सवात तारेवरची कसरत करावी लागत आहे तसेच. सदरचा रस्ता बिओटी तत्त्वावर एका कंपनीला दिला असुन सदर कंपनी दिवस रात्र पडघा टोल नाक्यावर टोल वसुली करत असुन महामार्गावरील खड्डे थातुर मातुर साहीत्य, खडी वापरून खड्डे भरण्याचे काम करते परंतु निकृष्ठ दर्जाच्या साहीत्यामुळे अल्पावधीतच खड्डयातील खडी बाहेर येऊन महामार्गावर खड्डयाशेजारी छोटे उंचवटे तयार झाले असुन वाहन कसे चालवायचे असा प्रश्न वाहनचालकांना पडला आहे तसेच रात्रीच्या वेळी अपघाताची शक्यताही नाकारता येत नाही तर अनेक वेळा खड्डयात वाहने आदळून नादुरुस्त होत आहेत. त्यामुळे जेसीबीच्या सहाय्याने तयार झालेले उंचवटे काढुन टाकुन रस्ता दुरूस्त करण्याची मागणी वाहनचालकांनी केली आहे.

# गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी वाशिंद पोलीस स्टेशन सज्ज

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाशिंद : आगामी गणेशोत्सव सण शांततेत पार पाडण्यासाठी वाशिंद पोलीस ठाणे सज्ज झाले आहे. या पार्श्वभूमीवर वाशिंद पोलीस ठाण्यामार्फत शांतता समिती, पोलीस पाटील, समन्वय समिती आणि सर्व गणेश मंडळ पदाधिकारी यांची बैठक घेऊन त्यांना सर्व त्या सूचना देण्यात आलेले आहेत. गणेशोत्सव मंडळाची समन्वय साधण्यासाठी प्रत्येक मंडळाकरिता एक अंमलदार नेमण्यात आलेला असून सर्व मंडळांना भेटी देण्यात आलेले आहे. बाजारामध्ये गर्दी होऊ नये आणि वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी पोलिस अधिकारी, अंमलदार व होमगार्ड यांचे बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आलेले आहे. गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी भिवंडी यांचे आदेशाने वाशिंद पोलीस स्टेशन हद्दीतील 16 इसमांच्यावर तडीपारीची कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच 11 इसमांच्यावर शांतता राखण्यासाठी बॉण्ड घेण्यात आलेले आहे आणि 60 पेक्षा अधिक इसमांना शांतता राखण्यासाठी नोटीस देण्यात आलेली आहे.

गणेश उत्सव शांततेत साजरा करण्यासाठी सर्व नागरिकांनी सहकार्य करावे जर कोठे नागरिकांना अनुचित प्रकार घडत असेल तेव्हा तत्काळ पोलिस ठाणे वाशिंद किंवा 112 यांचेशी संपर्क करावा तसेच अफवावर विश्वास ठेवू नये आणि अफवा देखील पसरू नये. सोशल मीडिया वापरतांना योग्य ती काळजी घ्यावी असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. श्री डी. एस. स्वामी, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. अनमोल मीत्तल आणि उपविभागीय पोलिस अधिकारी शहापूर मिलिंद शिंदे यांनी केले आहे.

# गणपती देखाव्यातून केंबारी कुंटुबाने मांडली मुरबाड रेल्वेची जिवंत व्यथा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड(दिलीप पवार) : मुंबईचे शिल्पकार नाना शंकरशेठ यांची जन्मभूमी असणाऱ्या मुरबाडकरांचे रेल्वेचे स्वप्न सत्यात कधी उतरेल ते माहित नाही, मुरबाड रेल्वे येईल तेव्हा येईल परंतु तालुक्यातील डेहनोली येथील केंबारी कुंटुबाने घरच्या गणपती बाप्पाच्या देखाव्यातून मुरबाड रेल्वेची व्यथा मांडून संपूर्ण तालुक्याचे लक्ष वेधले आहे.

मुंबईला लागून असलेल्या ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्याला रेल्वे मिळावी यासाठी देश स्वातंत्र्य झाल्या पासून मागणी होत आहे परंतु राजकीय इच्छा शक्ती नसल्याने व तांत्रिक कारणे पुढे करित मुरबाड करांचे रेल्वेचे स्वप्न अजूनही पुर्ण होत नसल्याने त्याची खंत डेहनोली येथील पदवीधर उच्च शिक्षित कु. ऋतिक रघुनाथ केंबारी याच्या मनात घर करून राहिली होती व हि संकल्पना त्याने देखाव्यातून रेखाटण्याचे ठरवले. या वर्षाच्या गणपती बाप्पाच्या डेकोरेशन मध्ये त्याने मुरबाड रेल्वे स्थानकाचे हुबेहूब बोलके चित्र रेखाटले असून यामध्ये त्याने कोणतिही कसर ठेवलि नाही. रेल्वे स्थानकात ज्या सुविधा असायला हव्यात त्या सर्वाचा अत्यंत कौशल्याने वापर केला असल्याचे दिसत आहे.या देखाव्याचि संकल्पना





कशी सुचली याविषयी केंबारी कुंटुबाशि बातचीत केलि असता गेले अनेक वर्ष समस्त मुरबाडकर रेल्वेच्या प्रतिक्षेत आहेत परंतु त्यांच्या नशीबी फक्त गाजर दाखवले जात असून रेल्वे नसल्याने तालुक्याचा विकास खुंटला आहे. मुरबाडला लागून असलेल्या शहापूरसह ईतर सर्व तालुक्यांचा विकास हा केवळ रेल्वेमुळेच झाला असून मुरबाड करांना आजही दळण वळणाची साधने नसल्याने मुंबई, ठाणे सारख्या शहरामधे प्रवास करणे जिकरिचे झाले आहे. येथील शेतकऱ्यांनी पिकवलेल्या भाजिपाळा, दुध, रेल्वे नसल्याने त्याला भाव मिळत नाही.तरूणांना नोकरी धंद्यासाठी येणे जाणे कठीण असल्याने कुठेतरी बाहेर दिवस काढावे लागतात, विद्यार्थी वर्गाचि हालत खराब होत चाललि आहे. माळशेज घाटाच्या पायथ्याशी राहणाऱ्या मुरबाडच्या माणसाला पन्नास कि.मि. अगोदर प्रवास करून मुरबाडला यावे लागते व नंतर येथून भंगार, जीर्ण झालेल्या गाड्यातून जिवघेणा प्रवास करावा लागत आहे व त्यासाठी वेळ वाया जात आहे .

मुरबाड करांचे आज वर्षानुवर्षे धकाधकीचे जगणे चालू असून लोकप्रतिनिधी व सरकारचे लक्ष वेधण्यासाठी हा देखावा आम्ही दाखवण्याचा प्रयत्न केला असल्याचे मारूती केंबारी यांनी सांगितले आहे. तर हि मुख्य संकल्पना ऋतिक रघुनाथ केंबारी याला सुचली असून त्याला रोशन केंबारि, केयुर केंबारि आणि वरद केंबारि यांनी मोलाची साथ दिली आहे. हि नाविन्यपूर्ण संकल्पना प्रत्यक्षात देखाव्यातून दाखवून समस्त मुरबाडकरांच्या रेल्वे विषयी भावना मांडल्या असल्याने या तरूणांचे तालुक्यात विशेष कौतुक होत आहे.

# पालघर जिल्हा कांग्रेसची ‘वोट चोरी विरोधात’ स्वाक्षरी मोहीम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : लोकसभेतील विरोधी पक्षनेते, राहुल गांधी यांनी सुरू केलेल्या “वोट चोरी विरोधातील आंदोलन” समर्थनार्थ, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व पालघर जिल्हाध्यक्ष .प्रफुल पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार, पालघर तालुका कॉंग्रेसतर्फे ” वोट चोरी विरोधात सुरू असलेल्या आंदोलनाच्या समर्थनार्थ. सह्या मोहिमेचे आयोजन करण्यात आले. यावेळी पालघर तालुका कॉंग्रेस अध्यक्ष राजेश अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली पालघर रेल्वे स्टेशनसमोर सह्यांची मोहीम राबविण्यात आली. मोहिमेची सुरुवात पालघर तालुका अध्यक्ष राजेश अधिकारी यांनी बॅनरवर स्वाक्षरी करून केली.



यावेळी उपस्थित स्मरणार्थ करण्यासाठी जमलेल्या जमावास संबोधित करताना राजेश अधिकारी यांनी सांगितले की, “राहुल गांधी यांनी सुरू केलेले हे आंदोलन आता गावोगावी, खेडोपाडी पोहोचवले जाईल. लोकशाहीने दिलेल्या मताधिकाराची पायमल्ली करून मतांची चोरी करणारे हे सरकार बेकायदेशीर आहे. संविधानाने दिलेले ‘एक व्यक्ती, एक मत’ हे अधिकार मोदी सरकारने हिरावून घेतले असून, न्याय मिळेपर्यंत ही लढाई सुरू राहील.

या स्वाक्षरी मोहिमेत कॉंग्रेस कार्यकर्त्यांसह नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. “वोट चोर, गद्दी सोड” अशा घोषणा कार्यकर्त्यांनी दिल्या. यावेळी आंदोलनात शहर कॉंग्रेस अध्यक्ष मनोहर दांडेकर, नरोत्तम पाटील, किरण पाटील, रोशन पाटील, आसिफ मेमन, मनोज दांडेकर, मनोज पाटील, शैला प्रसाद, सलीम पटेल आदींसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# कल्याण डोंबिवली मनपाच्या पर्यावरण पूरक कृत्रिम विसर्जन तलावांना नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण / दि. 28 :**

**पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासह ६ फुटा पेक्षा कमी उंचीच्या श्री गणेश मूर्तींचे कृत्रिम तलावात विसर्जन करण्याचे आवाहन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने यापूर्वीच केले आहे. या पार्श्वभूमीवर कल्याण डोंबिवलीतील गणेश घाटांवर उभारण्यात आलेल्या कृत्रिम विसर्जन तलाव संकल्पनेला, दीड दिवसांच्या श्री गणेश विसर्जनाचे वेळी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले. महापालिकेने केलेल्या आवाहनानुसार हजारो गणेशभक्तांनी या कृत्रिम विसर्जन तलावांमध्ये बाप्पाचे आज विसर्जन करत पर्यावरण रक्षणाचा संदेश देत महापालिकेच्या या अभिनव संकल्पनेचे कौतुकही केले.**

यंदाच्या वर्षी अधिकाधिक व्यापक प्रमाणात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी महापालिकेने चंग बांधला असून त्यादृष्टीने आवश्यक असलेली कार्यवाहीही केली आहे, कृत्रिम विसर्जन तलावाची संकल्पना ही त्यापैकीच एक असून पर्यावरणाच्या रक्षणासाठी आणि जलप्रदूषण टाळण्यासाठी कृत्रिम विसर्जन तलाव उभारणे हे एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे.

पारंपारिकपणे गणेश विसर्जनासाठी नद्या, तलाव आणि समुद्राचा वापर केला जातो, परंतु मूर्तीतील रंग, प्लास्टर, इत्यादींचे रासायनिक मिश्रण पाण्यात मिसळून निसर्गास हानी पोहोचते. यासाठी महापालिकेने दुर्गाडी गणेश घाट आणि मोठागाव गणेश घाट या प्रमुख ठिकाणी त्याचबरोबर महापालिकेच्या दहाही प्रभागात देखील कृत्रिम विसर्जन तलाव उभारले आहेत. इतकेच नव्हे तर प्रभाग निहाय विसर्जन स्थळे गुगल मॅप च्या माध्यमातून दाखवून जनजागृती केल्यामुळे स्थानिक नागरिकांना विसर्जनासाठी जाताना होणारी अडचण आणि ताण कमी झाला आहे.

गणेशोत्सवाचा प्रारंभ होण्याच्या आधी महानगरपालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी नागरिकांना ६ फुटांपेक्षा कमी उंचीच्या श्री गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात विसर्जित करण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार आज दीड दिवसांच्या गणपती बाप्पांच्या विसर्जनाच्या दिवशी हजारो गणेशभक्तांनी या कृत्रिम तलावात आपल्या बाप्पाचे विसर्जन करत पर्यावरण रक्षणात आपला सिंहाचा वाटा उचलल्याचे दिसून आले.

यासोबतच महापालिकेने विसर्जन तलावांच्या आजुबाजुच्या परिसरात निर्माल्य संकलनाची व्यवस्था केली असल्याने भक्तांना त्यांच्या गणेश मूर्तींचे विसर्जन करताना निर्माल्य विसर्जित करण्याचीही चांगली सुविधा उपलब्ध झाली.

श्री गणेश विसर्जनासाठी नागरिकांचा प्रतिसाद अत्यंत उत्स्फूर्त आणि सकारात्मक आहे. पर्यावरणाची काळजी घेत अनेक गणेशभक्तांनी स्वतःच्या स्तरावर ही कृत्रिम तलावांच्या वापरास प्रोत्साहन दिले आहे. हे तलाव श्री गणेश मूर्तींचे विसर्जनासाठी खूप सोयीचे ठरले आहेत, कारण यामुळे ना केवळ वेळेची बचत झाली, तर प्रदूषणही टळले आहे. यामुळे श्रीगणेश विसर्जनाचा पारंपारिक उत्सव आणि पर्यावरण संरक्षण यांचा समतोल साधला जात असल्याबद्दल गणेशभक्तांनी महापालिकेचे मनापासून आभार मानले आहेत.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कृत्रिम विसर्जन तलाव संकल्पनेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळालेला आहे. हे एक उत्तम उदाहरण आहे की, प्रत्येक छोटा बदल देखील मोठ्या प्रमाणावर पर्यावरण रक्षणात मदत करू शकतो ,त्यासाठी सर्व नागरिकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा आणि आपल्या शहराला स्वच्छ, हरित आणि प्रदूषणमुक्त बनवण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन महापालिकेमार्फत करण्यात येत आहे.





Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024